# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद,

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत फाजलपुरा औरंगाबाद

दुरध्वनी क्र. 0240-2331211/ Fax No. 0240-2338394, email id - expcellhq@gmail.com


जा.क्र.जिकअ/नि.खर्च नि कक्ष/2019/161 दिनांक :- 16/04/2019

## नोटीस

प्रति,

श्री. हर्षवर्धन रायभान जाधव
मु.पो.पिशोर ता.कन्नड जि.औरंगाबाद

**विषय :- 19-औरंगाबाद लोकसभा सर्वसाधारण निवडणूक 2019**
मा. निवडणूक खर्च निरीक्षकामार्फत निवडणूक लढविणाऱ्या उमदेवारांचा दैनंदिन खर्च लेखा तपासणी बाबत.

संदर्भ :- 1. निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019
2. Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87
3. या कार्यालयाचे पत्र क्र.146 दिनांक 09.04.2019 ( तपासणी वेळापत्रक)

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमदेवारांनी लोकप्रतिनिधी अधिनियम 1951 चे कलम 77 नुसार निवडणूकीतील प्रत्येक उमेदवारास नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकापासुन ते निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरुन होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणूकीच्या संबंधात उमेदवास किंवा उमेदवाराच्या प्रतिनिधीला सर्व खर्चाचा स्वंतत्र व यथातथ्य हिशोब ठेवणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019 व Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी मतदान होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत दैनंदिन खर्चाचा लेखा तीन वेळा मा.निवडणूक खर्च निरीक्षकाकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक आहे तथापि दिनांक 16/04/2019 रोजी करण्यात आलेल्या व्दितीय तपासणीमध्ये दिनांक 07/04/2019 ते 11/04/2019 या कालावधीचे आपणाकडील खर्चाचे लेखे तपासणी केले असता सदरील अनियमितता (त्रुटी) आढळुन आल्या आहेत.

1. दैनंदिन खर्च करण्यात येत असलेल्या रकमा स्वतंत्र उघडण्यात आलेल्या बँक खातेमार्फत खर्च न करता परस्पर खर्च करण्यात आलेला आहे.
2. आपण दिनांक 28/03/2019 ते 11/04/2019 पर्यंतच्या खर्च रोखीने केले असुन दिनांक 28/03/2019 रोजी हाती शिल्लक असलेली रोख रक्कम बॅंकेत भरणा करुन त्यानंतर आवश्यकतेनुसार रक्कम काढुन खर्च केला नाही..
3. रक्कम रु. 10000/- व त्यावरील खर्च धनादेश/NEFT/DD दवारे करणे आवश्यक असतांना रोखीने करण्यात आलेला आहे. उदा. अनिल लाईट डेकोरेटर्स यांना दि. 30.03.2019 ते 03.04.2019 या कालावधीत रक्कम रू. 23375/- रोखीने प्रदान करण्यात आलेले आहे.
4. तपासणीच्यावेळी एकूण 14 अदत्त प्रमाणके रक्कम रू. 252250/- चे प्रदान करतांना प्रमाणकांवर उमेदवार अथवा प्रतिनिधीची स्वाक्षरी घेवून प्रमाणके सादर करावीत.
5. आपणाकडील लेखे आणि खर्च नियंत्रण कक्षाने परिरक्षित केलेली अभिरुप निर्देशनास नोंदवही (SOR) याचा ताळमेळ घातला असता रक्कम ऐवढी रु.61321/- एवढा खर्च कमी दर्शविला असल्याचे आढळुन आले आहे. सदर बाबतही Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 चा भंग करणारी आहे.

तेव्हा या नोटीसीव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, या संदर्भात आपला खुलासा ही नोटीस प्राप्त झाले पासून 48 तासाच्या आत या कार्यालयाकडे सादर करावा अन्यथा आपणा विरुध्द भा.द.वि 1860 चे कलम 171 (I) नुसार मा.सक्षम न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल या बाबत गांभियाने नोंद घ्यावी.

निवडणूक निर्णय अधिकारी
19-लोकसभा मतदार संघ औरंगाबाद

प्रत

1. जिल्हा माहिती अधिकारी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील नोटीसची व्यापक प्रसिध्दी स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात यावी.
2. जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3. सुचनाफलक

Scanned by CamScanner